सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर
राजे रघुजी नगर, सक्करदरा चौक, उमरेड रोड, नागपुर-४४००२४.

| | | |
|---|---|---|
| ☎कार्यालय : (०७१२) २७४९१९८ | अधिष्ठाता : (०७१२) २७४९१९८ | ई मेलः govtayurcollegenagpur@gmail.com |


क्रं.शाआमना/आस्था/का.सहा./पीपीव्हीसी/ ८१९८ /२०१९ दिनांक :- १९/११/१९

## पाहिजेत

संदर्भ :- १) Central Sector Scheme for Phamacovigilance of Ayurveda, Siddha, Unani and Homoeopathy Drugs: Guidelines
२) F.No.B-11003/5/9/2017 –AIIA/Admin/1476 Dated 26/08/2019 अ.भा. आयुर्वेद संस्थान, नवी दिल्ली यांचे कार्यालयीन आदेश
३) National Pharmacovigilance Coordination Centre, अ.भा. आयुर्वेद संस्थान, नवी दिल्ली यांचा ईमेल २८ ऑगस्ट २०१९
४) F.No.B-11003/5/9/2017 –AIIA/Fin/1765 Dated 25/09/2019 अ.भा. आयुर्वेद संस्थान, नवी दिल्ली यांचे पत्र

१) या महाविद्यालयातील Peripheral Pharmacovigilance Centre मध्ये Programme Assistant हे पद तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने भरण्याकरीता विहीत अटींची पुर्तता करणा-या पात्र व इच्छुक उमेदवारांना थेट मुलाखतीसाठी आमंत्रित करण्यात येत आहे (Walk in Interview)

२) रिक्त पदांचा प्रवर्गनिहाय तपशिल :

| पदनाम | पदसंख्या | आरक्षण |
|---|---|---|
| Programme Assistant | ०१ | सर्वसाधारण |

| | | |
|---|---|---|
| **१)** | **वयोमर्यादा** | **किमान वयोमर्यादा २४ वर्षे व कमाल वयोमर्यादा ५८ वर्षे** |
| २) | शैक्षणिक अर्हता | अ) संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची आयुर्वेद विषयातील स्नातक बीएएमएस पदवी (संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची द्रव्यगुण किंवा रसशास्त्र किंवा अगदतंत्र आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य)<br>ब) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. २८) या अधिनियमाच्या परीशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब, भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतापैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय वैद्यक परीषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रीय वैद्यक परीषदेने वेळोवेळी निर्देशीत केलेली समतुल्य अर्हता.<br>क) इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषेचे सम्यक् ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहिण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहीजे.<br>ड) संगणक हाताळणीचे सम्यक् ज्ञान असावे म्हणजे MSCIT प्रमाणपत्र असावे. |
| ३) | अनुभव | अनुभवाची अट नाही.तथापि सदर क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. |
| ४) | मानधन | प्रतिमाह रु.२५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ५) | नियुक्ती कालावधी व इतर अटी | १) ही नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ०४ महिन्यांच्या कालावधीकरीता राहील. National Pharmacovigilance Coordination Centre, अ.भा. आयुर्वेद संस्थान, नवी दिल्ली यांच्या निर्देश व अनुदानानुसार सदर उमेदवारास कामकाज समाधानकारक असल्यास तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने ही नेमणुक पुढील कालावधीकरिता देता येईल.<br>२) नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.<br>३) नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील.<br>४ उमेदवारास सार्वजनिक सुटया आणि रविवार व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची रजा अनुज्ञेय राहणार नाही.<br>५) करार पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारांचे राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी ०१ महिन्याची आगाऊ नोटीस अधिष्ठातांकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास ०१ महिन्याच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्याचा/तिचा राजीनामा मंजुर करता येईल.<br>६) करार पध्दतीवरील नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा अधिष्ठाता यांचेकडून नियमीतपणे घेण्यात येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास संबधीत उमेदवारांच्या नियुक्त्या पूर्वसूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठांताकडे राहतील.<br>७) करार पध्दतीच्या उमेदवारांस अधिष्ठाता यांच्या नियत्रंणाखाली आपल्या पदाचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील.<br>८) करार पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यावर विपरीत परीणाम होणार नाही याची दक्षता घेवुन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील.<br>९) करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमीत नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातही करार पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दावा करता येणार नाही. तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारांत घेता येणार नाही.<br>१०) नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ३ दिवसाच्या आंत नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल.<br>११) इतर संस्थेत नोकरीत असणा-या उमेदवारानी मुळ संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आणावे.<br>१२) कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.<br>१३) शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडुन वेळोवेळी निश्चित होणारे पदासंबधीच्या आवश्यकतेप्रमाणे बंधपत्र देणे बंधनकारक राहील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/ कार्यालयाकडुन वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील.<br>१४) नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत. |
| ६) | कामाचे स्वरुप | शासकीय आयुर्वेद महाविद्यालय , नागपूर येथील Adverse Drug Events तसेच नागपुरातील Misleading Ayurved Advertisement यांची माहिती व तपशील एकत्रित करणे. तसेच मा. अधिष्ठाता यांचे आदेशानुसार महाविद्यालय व रुग्णालय संबंधित सर्व कार्य करणे. |

इच्छुक उमेदवारानी मुलाखतीस येतांना सर्व संबधीत मुळ कागदपत्रे व त्याच्या सत्यप्रती सोबत खालील वेळापत्रकानुसार मुलाखतीस उपस्थित राहावे.

७) मुलाखतीचे वेळापत्रक (**Walk in Interview**)

| पदनाम | मुलाखतीचा दिनांक व वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|
| Programme Assistant | ११.१२.२०१९<br>दुपारी १२.३० | अधिष्ठाता यांचे दालन,<br>शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, राजे रघुजी नगर, सक्करदरा चौक, उमरेड रोड,<br>नागपुर-४४००२४ |

<u>महत्वाची सुचना :-</u> १) उमेदवारानी मुलाखतीस येतांना सर्व संबधीत मुळ कागदपत्रे व त्याच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात तसेच आरक्षीत पदासाठी संबधीत उमेदवांरांनी मुळ जात प्रमाणपत्र आणि जात वैद्यता प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र मुळ संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आणने अनिवार्य राहील.

२) उमेद्वारांना सुचित करण्यात येते कि, अर्हता, अटी ई.बाबतचा सविस्तर तपशिल www.mahayush.gov.in व www.gacnagpur.org या वेबसाईटवरुन प्राप्त करवुन घ्यावा.

वि.ग. पात्रीकर

**अधिष्ठाता,**
**शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,**
**नागपुर.**